# पोलीस स्टेशन जळगाव (जा)

आज दिनांक 11/02/2025 रोजी पोलीस स्टेशन जळगाव जामोद अंतर्गत आसलगाव ग्रामपंचायत येथे नवीन कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात भारतीय न्याय संहिता- 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 यातील कायदेशीर तरतुदी, I.T. Act मधील तरतुदी, तसेच सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधाया संबंधाने घ्यावयाची दक्षता , अनुसुचीत जाती जमाती अधिनियम,सायबर क्राईम, लैंगीक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम, दारुबंदी अधिनियम बाबत सविस्तर माहिती देवुन जनजागृती करण्यात आली.

सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकतेबाबत सतर्क राहणे, सायबर क्राईम मध्ये आरोपींच्या फसवणुकीच्या पध्दती, अशा घटनांपासून स्वतःचा बचाव करणे याबाबत पोलीस अधिकारी तसेच ॲडव्होकेट श्री.अनंता मानकर यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये आसलगाव ग्रामपंचायत सरंपच, उपसरपंच, पोलीस पाटील व नागरीक उपस्थीत होते.




स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०